सहकार, पणन व वस्त्रोद्योग विभाग
उपनिबंधक, सहकारी संस्था, कल्याण तालुका, कल्याण
यांचे कार्यालय
मल्हार संकूल बिल्डींग, ए टाईप, बी विंग, पहिला मजला, मोहिंदर सिंग हायस्कूलजवळ, आग्रारोड, घोडेखोत आळी, कल्याण(पश्चिम)

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ (२) अन्वये आदेश

जिल्हा उपनिबंधक
सहकारी संस्था, ठाणे.
19 APR 2017
३९९६
आवक क्रमांक
शाखा

जा.क्र.उपनि/कल्याण/बी-४/का.क.८८(२)/विठोबा कृपा हौ. /१७/23
दिनांक :- १७/०४/२०१७

वाचावे :- १) संस्थेचे सचिव श्री.जी.के.नायर यांनी या कार्यालयाकडे दि.११/०३/२०१६ रोजी केलेला अर्ज.
२) सदर प्रकरणी या कार्यालयाने घेतलेली दि.१२/०५/२०१६ रोजीची सुनावणी.
३) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८३ अन्वये दि.२७/०५/२०१६ रोजीचा या कार्यालयाकडील आदेश.
४) श्री.एस.एस.तोटे, सेवा निवृत्त जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (पदुम) ठाणे तथा चौकशी अधिकारी , विठोबा कृपा को.ऑप.हौ.सो.लि., कल्याण यांनी दि. १०/१०/२०१६ रोजी या कार्यालयास सादर केलेला चौकशी अहवाल.
५) महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ (२) मधील तरतूद

सहकारी संस्था कल्याण तालुका
सत्यमेव जयते
जिल्हा ठाणे

---

ज्याअर्थी,विठोबा कृपा को.ऑप.हौसिंग सोसा.लि., (या नावाने वाचावे) म्हसोबा मैदान, चिकणघर, कल्याण (पश्चिम), ता.कल्याण, जि.ठाणे, ही संस्था या कार्यालयामार्फत महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० व नियम १९६१ अन्वये नोंदलेली संस्था असून, सदर संस्था कायदेशीर कामकाजाच्या दृष्टीने या कार्यालयाच्या अधिकार कक्षेत येते. आणि,

ज्याअर्थी, या कार्यालयाकडील आदेश जा.क्र. उपनि/कल्याण/बी-४/कलम ८३/४२१/सन २०१६ दि.२७/०५/२०१६ च्या आदेशान्वये श्री.एस.एस.तोटे, सेवा निवृत्त जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (पदुम) ठाणे यांची चौकशी अधिकारी म्हणून नेमणूक करण्यांत आली होती. आणि,

ज्याअर्थी, श्री.एस.एस.तोटे, सेवा निवृत्त जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (पदुम) ठाणे तथा चौकशी अधिकारी यांनी उक्त नमूद संस्थेच्या चौकशीत आढळून आलेल्या गंभीर मुद्यांवर चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करुन चौकशी अहवाल उपरोक्त वाचावे क्रमांक ४ अन्वये या कार्यालयास सादर केलेला आहे आणि,

ज्याअर्थी, श्री.एस.एस.तोटे, सेवा निवृत्त जिल्हा विशेष लेखापरीक्षक, सहकारी संस्था, (पदुम) ठाणे तथा चौकशी अधिकारी यांनी सादर केलेल्या चौकशी अहवालातील मुद्यांबाबतचा अहवाल खालील प्रमाणे आहे.

<u>मुद्दा क्र.१</u> :- दि.१९/०३/२००९ रोजी संस्थेच्या मालकीची ४८९० चौरस मीटर जागा कल्याण डोंबिवली महानगरपालिकेस हस्तांतरीत करण्यासाठी संस्थेच्या तत्कालीन सचिव व अध्यक्ष यांनी संस्थेची वार्षिक सर्वसाधारण किवा विशेष सर्वसाधारण सभेत ठराव मंजुर करुन घेतलेला नसून आणि दि.०२/१०/२००८ रोजी विशेष सर्वसाधारण सभेमध्ये विषय पत्रीकेवर विषय नाही. दि.२७/०९/२००९ वार्षिक सभेत सदरचा वास्तुविशारद विषय घेतला परंतू सदर विषय वार्षिक सभेमध्ये याबाबत ठराव मंजूर पास झालेला नाही. श्री.दळवी आणि अशोसिएट यांचे म्हणणे सदर जागा राखीव मध्ये आहे असे तोंडी सभेत सांगण्यात आले हे इतिवृत्तांत लिहिलेले आहे. मात्र श्री.दळवी वास्तुविशारद याची सदर् सभेच्या इत्तीवृत्तावर हजर असले बाबत सही नाही. तसेच श्री.दळवी आर्क्रिटेक्चर यांनी स्वत: दिनाक दि.१६/०९/२०१५ रोजी महानगरपालिकेस पत्र पाठवून २००१.८० चौ.मी. जागा दिलेली असून त्यात बदल करुन ती २८८० चौ.मी. एवढी करावी असे सांगितले.

<u>मुद्दा क्र.२</u> :- श्री.महाजन यांनी मला काही बोलायचे नाही, तक्रारदार श्री.नायर यांनी सर्व सभासदांना पत्र वाटून कार्यकारी मंडळाची बदनामी केली आहे असे सांगितले. मात्र बाकी हजर सभासदांनी श्री.नायर यांनी केलेल्या तक्रारीतील मुद्दे बरोबर आहेत असा खुलासा केला आहे. तसेच वार्षिक सर्वसाधारण सभेची पूर्व मान्यता न घेता तत्कालीन पदाधिकाऱ्यांनी [illegible]

Scanned by CamScanner

घेतलेला आहे.हा वस्तुस्थिती ... या दस्तऐवजावर सही करणार ... चेअरमन व सेक्रेटरी यांनी सही
डीड ऑफ कन्व्हेन्स झालेला आहे. या दस्तऐवजावर सही करणार ... यावर देखील चेअरमन व सेक्रेटरी यांनी सही
व्ही.व्ही.सुधाकरण सेक्रेटरी , करार पत्र एप्रिल २००९ मध्ये झाले असून यावर देखील चेअरमन व सेक्रेटरी यांनी सही
केली आहे. सदरचे पत्रके दि.०८/०९/२००९ रोजी श्री.डी.एम.दळवी व वास्तुविशारद यांचे मार्फत कल्याण डोंबिवली
महानगरपालिकेमध्ये दिले आहेत.

<u>मुद्दा क्र.३ :-</u> तक्रारदार यांनी मांडलेले मुद्दे तसेच तत्कालीन समितीस चौकशीसाठी उपस्थित रहावयाची संधी देवूनही काही सदस्यांनी गैरहजर राहून असहकार्य केले ही वस्तुस्थिती विचारात घेता चौकशी अधिकारी यांचे मत आहे की, तत्कालीन कार्यकारी मंडळातील तीन सदस्य व संस्थेचा एक सभासद यांनी मनमानी व्यवहार करुन संस्थेची फार मोठी हानी केलेली आहे. दि.०२/०७/२०११ रोजी डिक्लरेशन ऑफ इन्डेमनिटी बॉन्ड संस्थेने महानगरपालिकेला करुन दिलेला आहे. यावर पदाधिकारी चेअरमन, सेक्रेटरी सभासद साक्षीदार म्हणून १)श्री.चंद्रकांत बी. वडनेरे - चेअरमन, २) श्री.नांबियार- सेक्रेटरी, ३)श्री.महाजन अजित गोपालराव- साक्षीदार संचालक, श्री.सुनिल जयराम- साक्षीदार संस्था सभासद यांच्या सह्या आहेत.

वरील मंडळाने हमी पत्र देऊन रजिस्ट्रेशन केले व त्या मध्येच जागेची किंमत नमूद आहे. श्री.वडनेरे, श्री.नांबियार व साक्षीदार श्री.महाजन, श्री.सुनील जयराम सोसायटीच्या आर्थिक हानीस कारणीभूत आहेत असे प्रथम दर्शनी दिसून येते. तसेच श्री.नांबियार सेक्रेटरी सन २००९ मध्ये ही तेच सेक्रेटरी होते त्यावरुन गैरव्यवहाराचे प्रमुख सुत्रधार श्री.नांबियार आहेत असे चुकीचे ठरणार नाही. रोजनाम्याच्या वेळी उपस्थित सदस्यांनी तसा जबाब दिलेला आहे. दि.३०/०९/२००९ रोजी वरील व्यवहाराला कार्यकारी मंडळाने त्यांच्या मासिक सभेमध्ये मंजुरी घेतलेली आहे. त्यामुळे कार्यकारी मंडळातील सर्व सदस्यांना वैयक्तीक व सामुहीक रित्या संस्थेच्या झालेल्या हानीस जबाबदार धरण्यात येत आहे.

त्याअर्थी, महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ (२) अन्वये चौकशी करुन संबंधितांवर जबाबदारी निश्चित करण्यासाठी मी प्राप्त अधिकारान्वये खालील प्रमाणे आदेश देत आहे.

## -: <u>आ दे श</u> :-

महाराष्ट्र सहकारी संस्था अधिनियम १९६० चे कलम ८८ (२) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानूसार मी योगेश रं. देसाई, उपनिबंधक, सहकारी संस्था, कल्याण तालुका, जि. ठाणे, "विठोबा कृपा को. ऑप. हौसिंग सोसा.लि.," म्हसोबा मैदान, चिकणघर, कल्याण (पश्चिम), ता.कल्याण, जि.ठाणे, या संस्थेच्या कलम ८३ अन्वयेच्या चौकशी अहवालाचे अनूषंगाने सोबत जोडलेल्या परिशिष्ट अ मध्ये नमूद केलेल्या मुद्दयासंबंधी संस्थेस झालेल्या आर्थिक हानीची जबाबदारी निश्चित करुन ती वसुल करणेसाठी निर्देश देणेसबंधी श्री. आर. के. भास्कर, सहाय्यक निबंधक, सहकारी संस्था, मुरबाड यांची "प्राधिकृत अधिकारी" म्हणुन नियुक्ती करीत आहे. यासंबंधीची कारवाई त्वरीत सुरु करुन त्याबाबतचा अहवाल सहा महिन्याचे आत पूर्ण करावयाचा आहे. चौकशी फी म्हणुन रक्कम रुपये १०,०००/- निश्चित करण्यांत येत आहे.

सदरचा आदेश आज दि. १७/०४/२०१७ रोजी माझे सही व कार्यालयाचे मुद्रेसह दिली आहे.

उपनिबंधक सहकारी संस्था कल्याण
सत्यमेव जयते

[ योगेश रं. देसाई ]
उपनिबंधक
सहकारी संस्था, कल्याण तालुका

ठिकाण : कल्याण
दिनांक : १७/०४/२०१७

Scanned by CamScanner